महासंचालक (न्यायिक व तांत्रिक),महाराष्ट्र राज्य यांचे अधिनस्त संचालक,न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय,महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या आस्थापनेवर सहायक रासायनिक विश्लेषक,गट-ब या पदावर सरळसेवेने नियुक्ती करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन आदेश क्र. एफएसएल०४१८/प्र.क्र.४२८/पोल-४

दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुख्य इमारत, मुंबई-४०० ०३२.

दिनांक:-१३ मे, २०१९

<u>संदर्भ</u> :- १) शासन आदेश,गृह विभाग क्र.एफएसएल-०५११/१११९/प्र.क्र.४४१/पोल-४, दि.१९.११.२०११

२) शासन आदेश,गृह विभाग क्र.एफएसएल-०५११/१११९/प्र.क्र.४४१/पु.बां.क्र.६/ पोल-४, दि.०५.०१.२०१३

३) कक्ष अधिकारी, महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई यांचे पत्र क्रमांक-११६७/१२५६/ आठ, दि.०९.०७.२०१८

प्रस्तावना :-

महासंचालक (न्यायिक व तांत्रिक) यांच्या अधिनस्त असलेल्या संचालक, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांच्या आस्थापनेवर सहायक रासायनिक विश्लेषक,न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा,गट-ब ही पदे कार्यरत आहेत. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने वरील संदर्भाधिन दि.०९.०७.२०१८ च्या पत्रान्वये मुळ याचिका क्र.६०३२/२०१२ या प्रकरणी मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद यांच्या दि.११.०४.२०१८ रोजीच्या आदेशानुसार व सदर आदेशाविरुध्द आयोगाकडून मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका (Special Leave Petition) दाखल करण्याच्या व त्यावरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून श्री.गोविंद सुधाकर भोसले,सहायक रासायनिक विश्लेषक, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, गट-ब (जाहिरात क्र.०४/२०१० आयटम क्र.५) या पदाकरीता शिफारस केलेली असून त्यांना सदर पदावर सरळसेवेने नियुक्ती करण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन आदेश :-

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केल्याप्रमाणे श्री. गोविंद सुधाकर भोसले , यांची प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, औरंगाबाद येथे परिविक्षाधीन सहायक रासायनिक विश्लेषक, गट-ब या पदावर स्थानापन्न नियुक्ती खालील नमूद केलेल्या अटी व शर्तीनुसार करण्यात येत आहे.

१) संबंधित उमेदवारास नियुक्तीचे आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत नियुक्तीच्या ठिकाणी हजर रहावे अन्यथा सेवाज्येष्ठता बाधित होईल.

२) सदर नियुक्तीच्या ठिकाणी रुजू होण्यासाठी उमेदवारांना प्रवास भत्ता अनुज्ञेय नाही.

३) सदरहू उमेदवाराला या आदेशान्वये नियुक्ती दिली असली तरी श्री. भोसले यांचा गुणवत्ता क्रमांक हा यापूर्वीच्या गुणवत्ता यादीतील अनुक्रमांक १६- श्रीमती मालानी कोमल प्रकाश यांच्या नंतर तर अनुक्रमांक १७-श्रीमती ढमढेरे रोहीणी विश्वास यांच्या आधी राहील.

४) सदरहू उमेदवारांना शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांकअंनियो १००५/१२६/सेवा-४, दि.३१.१०.२००५ नुसार लागू केलेली परिभाषित अंशदाय निवृत्तीवेतन योजना आता शासन परिपत्रक वित्त विभाग क्र.संकीर्ण २०१७/प्र.क्र.६८/सेवा-४,दि.१०.०७.२०१७ अन्वये राष्ट्रीय निवृत्ती योजना म्हणून लागू राहील.

५) परिविक्षा कालावधी ते नियुक्तीच्या पदावर रुजू झाल्याच्या तारखेपासून २ वर्षाचा (प्रशिक्षण कालावधी धरुन) आहे.

६) सदर पदासाठी विहित केलेले प्रशिक्षण त्यांना पूर्ण करणे बंधनकारक राहील.

७) उमेदवाराने परिविक्षाधीन कालावधीत विहित विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

८) शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग,क्र.प्रशिक्षण-२००/प्र.क्र.६१/२००१/३९, दिनांक १९ मार्च, २००३ अन्वये संगणक हाताळणी/वापराबाबतचे शासन मान्यताप्राप्त मूळ

प्रमाणपत्र नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत विभागप्रमुखाकडे सादर करणे आवश्यक आहे.

९) सदर उमेदवाराने अधिवास प्रमाणपत्र,संगणक प्रमाणपत्र व शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे मूळ स्वरुपात ६ महिन्यांच्या कालावधीत व लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र मूळ स्वरुपात तात्काळ सादर करणे बंधनकारक राहील.

१०) श्री. गोविंद सुधाकर भोसले यांची शिफारस मूळ याचिका क्र.६०३२/२०१२ या प्रकरणी मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांच्या दि.११.०४.२०१८ रोजीच्या आदेशानुसार व सदर आदेशाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका (Special Leave Petition) दाखल करण्याच्या व त्यावरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहील.

११) दोन वर्षाचा परिविक्षाकाळ किंवा त्यानंतर शासनाने विहित नियमानुसार वाढविलेला परिविक्षाकाळ समाधानकारकरित्या पूर्ण केल्यानंतर त्यांची सहायक रासायनिक विश्लेषक या संवर्गात नियमित नेमणूक केली जाईल.

१२) परिविक्षा कालावधीमध्ये सातव्या वेतन आयोगातील सुधारीत वेतन मॅट्रीक्समधील वेतनस्तर S-१५ : ४१,८००-१,२३,३० या वेतनश्रेणीतील वेतन मिळेल. परिविक्षा कालावधीतील एक वर्ष पूर्ण झाल्यावर पहिली वार्षिक वेतनवाढ देण्यात येईल व त्यानंतरची वेतनवाढ परिविक्षा कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण केल्यानंतर शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग,क्र.एसआरव्ही-१३७०/डी, दि.१२.०४.१९७२ अनुसार देण्यात येईल. त्यांना नियमाप्रमाणे महागाई भत्ता व इतर भत्ते अनुज्ञेय राहतील.

१३) जर दोन वर्षाच्या कालावधीच्या आत किंवा वाढविलेल्या परिविक्षा कालावधीमध्ये कामाचा अपेक्षित दर्जा प्राप्त करु शकले नाहीत आणि/किंवा विहित परीक्षा/चाचण्या उत्तीर्ण झाले नाहीत किंवा गैरवर्तणूकीबद्दल दोषी आढळले किंवा शासकीय सेवेत अभियोग्य नसतील तर अशा उमेदवाराची सेवा समाप्त करण्यात येईल.

१४) नियमाप्रमाणे उमेदवारास विहित मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण व्हावे लागेल व सदर परिक्षा उत्तीर्ण न झाल्यास त्यानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

१५) वर नमूद केलेल्या अटी व शर्ती व्यतिरिक्त महाराष्ट्र शासनाच्या अधिपत्याखालील गट-ब च्या अधिकाऱ्यांना लागू असलेले अन्य सेवाविषयक नियम त्यांना लागू होतील.

१६) उमेदवारांची पदस्थापना सदर शासन निर्णयात दर्शविण्यात आलेल्या ठिकाणीच करण्यात येईल. तसेच उमेदवाराची ओळख पटविण्यासाठी छायाचित्र असलेले आधार कार्ड, मोटार ड्रायव्हिंग लायसन्स अथवा अन्य वैध प्रमाणपत्रे यापैकी एकाच्या आधारे रुजू करुन घेण्याबाबतची दक्षता संचालक, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांनी घ्यावी.

२. सदर शासन आदेश महाराष्ट शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१९०५१३१३१९०६६०२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Sunil J Sovitkar

Digitally signed by Sunil J Sovitkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=eb8ad070bfe5fedb8636c8af019b6d5b7aee194a6447 5e6d9cb854a5f398ccfa, serialNumber=a1caa5c3fca3d18d9c61102c13b0f35f75325775 9705f84374415fa099af3556, cn=Sunil J Sovitkar
Date: 2019.05.13 13:25:44 +05'30'

(सु.ज.सोवितकर)

सह सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. महासंचालक (न्यायिक व तांत्रिक),महाराष्ट्र राज्य,मुंबई.
२. संचालक, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय,महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. सचिव, महाराष्ट लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने)
४. मा.मंत्री (गृह) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई.
५. सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,मुंबई
६. महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा),महाराष्ट्र राज्य,मुंबई/नागपूर.
७. उपसंचालक,प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा,औरंगाबाद.
८. अधिदान व लेखाधिकारी/निवासी लेखा परीक्षा अधिकारी,मुंबई.
९. जिल्हा कोषागार अधिकारी,औरंगाबाद.
१०. संबंधित उमेदवार (श्री.गोविंद सुधाकर भोसले, मु. कुंबेफळ, पो. अंबासाखर, ता. अंबाजोगाई, जि. बीड -४३१ ५२३.)
११. निवड नस्ती/गृह विभाग (पोल-४).